महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT AUTHORITY

म्हाडा
MHADA

**मुख्य जनसंपर्क अधिकारी कार्यालय (म्हाडा)**

जा.क्र./मुजसंअका/प्रसिद्धी पत्रक/१२७/२०१९ दि. १९/०१/२०१९

मा. संपादक / मुख्य बातमीदार / ब्युरो चिफ / प्रतिनिधी,

______________

**प्रसिद्धी पत्रक**

**कोंकण मंडळ सदनिका सोडत-२०१८**

# यशस्वी अर्जदारांना कागदपत्रे सादर करण्यासाठी २८ जानेवारीपासून विशेष मोहीम

मुंबई, दि. १९ जानेवारी, २०१९ :- कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे सन २०१८ मध्ये काढण्यात आलेल्या ९०१८ सदनिकांच्या सोडतीतील यशस्वी अर्जदारांना पात्रता निश्चितीकरिता आवश्यक पुरावे/कागदपत्रे सादर करण्यासाठी दि. २८ जानेवारी ते ८ फेब्रुवारी २०१९ या कालावधीत विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

वांद्रे पूर्व येथील गृहनिर्माण भवनाच्या प्रांगणात सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेदरम्यान दररोज ५०० यशस्वी अर्जदारांची पात्रता निश्चित केली जाणार आहे. सोडतीतील संकेत क्रमांक २७४ विरार बोळींज (अल्प उत्पन्न गट) व संकेत क्रमांक २७६ बाळकूम ठाणे (मध्यम उत्पन्न गट) या योजनेतील सर्व यशस्वी अर्जदार तसेच टप्पा क्रमांक १ मध्ये राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत ज्या यशस्वी अर्जदारांना सहभाग घेता आला नाही अशा अर्जदारांनी पात्रता निश्चित करण्यासाठी या विशेष मोहीमेत सहभागी होऊन आवश्यक कागदपत्रे / पुरावे सादर करावीत, असे आवाहन कोंकण मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. विजय लहाने यांनी केले आहे.

या विशेष मोहिमेत सहभागी होण्यासाठी दि. २१ जानेवारी ते ८ फेब्रुवारी २०१९ दरम्यान सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत वांद्रे पूर्व येथील म्हाडा कार्यालयातील मित्र कक्षातून टोकन दिले जाणार आहे. या टोकन क्रमांकाबरोबर अर्जदारास आवश्यक नमुना पत्रे व चेक लिस्ट दिली जाणार आहे. टोकन मिळवण्यासाठी अर्जदाराने सोडतीत यशस्वी झालेल्या अर्जाची प्रत व स्वतःचे ओळखपत्र सोबत आणावे. पात्रतेसाठी आवश्यक नमुना पत्रे व चेक लिस्ट म्हाडाचे संकेतस्थळ https://mhada.gov.in वरही उपलब्ध करून देण्यात आली आहे. उपरोक्त कालावधीत अर्जदाराने पात्रतेसंबंधी लागणारे कागदपत्रे / पुरावे सादर न केल्यास भविष्यात यशस्वी अर्जदाराला मंडळातर्फे पुन्हा संधी उपलब्ध करून दिली जाणार नाही व संबंधितांचा अर्ज रद्द करून नियमानुसार प्रतीक्षा यादी कार्यान्वित करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

गृहनिर्माण भवन, कलानगर, वान्द्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी ६६४०५०००
फॅक्स नं. : ०२२-२६५९२०५८

Griha Nirman Bhavan, Kalanagar, Bandra (East), Mumbai-400 051.
Phone : 66405000
Fax No. : 022-26592058 Website : www.mhada.maharashtra.gov.in